ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख १५ फेब्रुवारी, १९६१ | अंक ४


## विविध माहिती

**कॅनडा–अमेरिकेचें सहकार्य**—पश्चिम कॅनडांतील कोलंबिया ह्या नदीच्या पाण्याचा उपयोग करून घेण्याच्या एका योजनेसाठी कॅनडा व अमेरिका ह्यांनीं करार केला आहे. ही नदी अमेरिकेच्या उत्तरेच्या किनाऱ्यावरील पॅसिफिक समुद्राला मिळते. नदीवर एकूण पांच धरणें बांधण्यांत येणार असून ह्या कामासाठीं ८५ कोटी डॉलर्सवर खर्च येणार आहे.

**लहान मुलांसाठीं विश्रांतिस्थानें**— हिंदमधील थंड हवेच्या अनेक ठिकाणीं मोठमोठ्या इमारती वापरल्या न जातां पडून आहेत. त्या योग्य मोबदला देऊन ताब्यांत घ्याव्या व तेथें लहान मुलांना विश्रांति घेण्याची सोय करण्यांत यावी अशी इच्छा पं. नेहरूंनीं व्यक्त केली आहे. सिमला येथें स्थापन करण्यांत आलेल्या अशा स्थानाला भेट दिली असतां त्यांनीं वरील विचार व्यक्त केले. ही इमारत पतियाळाच्या महाराजांनीं पंजाब सरकारला देणगी म्हणून दिलेली आहे.

**पोरकीं मुलें दत्तक घेतलीं**—आंतरराष्ट्रीय सहजीवनाचा प्रयोग म्हणून स्वीडनमधील एक दांपत्य अहमदाबाद येथील एका प्रसिद्ध वकिलाच्या घरीं राहण्यास आले होते. ह्या दंपतीनें एक अनाथ मुलगा व एक अनाथ मुलगी दत्तक म्हणून घेतली आहेत. मुलगा ४ महिन्यांचा असून मुलगी ६ महिन्यांचीं आहे. ह्या जोडप्याला मुलें नाहींत. त्यांना भारत देश फार आवडतो.

**कृत्रिम गर्भधारणेचीं मुलें**—कृत्रिम गर्भधारणेच्या पद्धतीनें अमेरिकेंत दरसाल ३०,००० मुलांचा जन्म होत असावा असा अंदाज करण्यांत आला आहे. अशा प्रकारचीं मुलें कायद्यानें मानलेलीं नाहींत. त्यामुळें त्यांना वारसाहक्क प्राप्त होत नाहींत. तथापि, ही पद्धत अमेरिकेंत फैलावत असल्यानें तेथें वीर्याच्या बँक्स स्थापन होण्याची शक्यता आहे.

**गॅझेटिअर ऑफ इंडिया**—गॅझेटिअर ऑफ इंडिया ह्या प्रकाशनाच्या पहिल्या खंडाच्या छपाईला लवकरच प्रारंभ होईल. ह्या खंडाची पृष्ठसंख्या ५०० होईल व त्यांत भारतामधील लोक, भाषा, धर्म, सामाजिक जीवन, हवा, वनस्पति व प्राणी ह्या-संबंधींची माहिती असेल. दुसऱ्या खंडांत भारताच्या संस्कृती-विषयीं माहिती देण्यांत येणार आहे.

**लेनिनग्रॅड बंदर बारमहा खुलें**—रशिआंतील लेनिनग्रॅडचें बंदर हिंवाळ्यांत समुद्र गोठल्यामुळें बोटींना वापरतां येत नाहीं. परंतु ह्यापुढें ते बारमाहा वापरण्यांत येईल अशी तजवीज करण्यांत येणार आहे. हिंवाळ्यांत बर्फ फोडणाऱ्या बोटींचा उपयोग करून बोटींचा मार्ग खुला करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. रशिआच्या उत्तर किनाऱ्यावरील सर्व बंदरें हिंवाळ्यांत निकामी होतात.

**खोट्या पासपोर्टवाल्यांना अटक**—खोटे व बनावट पासपोर्ट मिळवून परदेशीं जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या २० लोकांना एका बंदरांत अटक करण्यांत आली आहे. हे लोक पंजाबमधील जालंदर जिल्ह्यांतील आहेत. ह्या प्रकरणांत प्रवासाची सोय करणाऱ्या कांहीं संस्थांचाहि हात आहे. अशा प्रकारानें ब्रिटनमध्यें जाऊं इच्छिणाऱ्यांची संख्या बरीच आहे.

**उत्पन्नावर मर्यादा घालणार !**— सीलोनचें सरकार व्यक्तीच्या उत्पन्नावर कमाल मर्यादा घालण्याचा विचार करीत असल्याची वार्ता आहे. कर वजा जातां दरसाल २०,००० रुपयांची कमाल मर्यादा घालण्यांत येण्याचा संभव आहे. कायदा करण्यांत आल्यास तो सर्वांना लागूं करण्यांत येईल. कोणत्याहि व्यवसायाच्या अगर धंद्याच्या माणसाची त्यांतून सुटका होणार नाहीं.

**मेंदूवरील शस्त्रक्रिया**—रशियन वैद्यक शास्त्रज्ञांनीं मेंदूंतील गाठीची शस्त्रक्रिया सोपी जावी म्हणून एक रसायन शोधून काढलें आहे. हें रसायन शरीरांत टोंचलें असतां तें गाठींत साचतें व त्याचा रंग पालटतो. त्यामुळें ही गाठ शस्त्रवैद्याला नुसत्या डोळ्यांनींहि दिसू शकते. ह्या औषधाचे उंदरावर केलेले प्रयोग यशस्वी झाले आहेत.

**इंदूरच्या गिरण्या बंद पडण्याचा धोका**—इंदूरमधील कापडाच्या सर्वच्या सर्व म्हणजे ७ गिरण्या कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें बंद पडण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. कांहीं गिरण्यांजवळ तर अगदींच थोडा कोळसा शिल्लक आहे कोळसा वेळेवर न मिळाल्यास गिरण्यांतील २० हजार कामगार बेकार होतील.

**सहकारी औद्योगिक वसाहत**— श्रीरामपूर येथें एक सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या वसाहतीसाठीं तेथील लोकांनीं ३०,००० रुपयांचें भांडवल अवघ्या एका आठवड्यांत जमविलें. वसाहतीच्या स्थापनेसाठीं महाराष्ट्र राज्य सरकारकडे २॥ लाख रुपयांच्या कर्जाची मागणी करण्यांत आली असून संस्थेला मंजुरीहि मागण्यांत आली आहे.

**शिकारीच्या टीकाकारांना उत्तर**— राणी एलिझाबेथच्या भारतामधील दौऱ्यांत तिचे पति ड्यूक ऑफ एडिंबरा ह्यांनीं वाघांची शिकार केली. ह्यासंबंधीं कांहीं ब्रिटिश वृत्तपत्रांत प्रतिकूल टीका आली होती. ह्या टीकेला उत्तर देतांना ब्रिटनमधील एका हिंदी डॉक्टरनें असें म्हटलें आहे कीं जे लोक गाई, डुकरें, कोंबड्या, अशासारखे गरीब प्राणी खातात त्यांना वाघाबद्दल आस्था वाटावी हें आश्चर्य आहे.

## वृत्तपत्रांच्या खपाचे तुलनात्मक आंकडे

### ब्रिटिश वृत्तपत्रें

| | |
|---|---|
| **( दैनिकें )** | |
| डेली मिरर | ४,४९७,००० |
| डेली एक्सप्रेस | ४,०५३,००० |
| डेली मेल | २,०७१,००० |
| डेली हेरल्ड | १,४६५,००० |
| डेली टेलिग्राफ | १,१४१,००० |
| न्यूज क्रॉनिकल | १,२०७,००० |
| डेली स्केच | १,१५६,००० |
| दि टाइम्स | २५४,००० |
| गार्डिअन | १८३,००० |
| फिनॅन्शिअल टाइम्स | ९५,००० |
| **( साप्ताहिकें )** | |
| न्यूज ऑफ दि वर्ल्ड | ६,५५५,००० |
| पीपल | ५,०५५,००० |
| संडे पिक्टोरिअल | ५,३३१,००० |
| संडे एक्सप्रेस | ३,४४७,००० |
| वूमन्स वीकली | १,५१२,००० |
| संडे टाइम्स | ८८०,००० |
| ऑब्झर्व्हर | ६६०,००० |
| **( इतर )** | |
| वूमन | ३,१७३,००० |
| वूमन्स ओन | २,४०४,००० |

### हिंदी वृत्तपत्रें

| | |
|---|---|
| **( दैनिकें )** | |
| इंडियन एक्सप्रेस | १७९,७६८ |
| टाइम्स ऑफ इंडिया | १३९,२६५ |
| थंथी | १३१,०३४ |
| हिंदू | ११०,९७३ |
| स्टेट्समन | ९७,५८९ |
| फ्री प्रेस जर्नल | ९७,९६२ |
| अमृतबझार पत्रिका | ८६,७२१ |
| आनंदबझार पत्रिका | ८४,०३५ |
| युगांतर | ८०,४०१ |
| नवभारत टाइम्स | ७९,८९४ |
| **( साप्ताहिकें )** | |
| आनंद विकातन | १५८,१३२ |
| कलकी | १०३,६८८ |
| ब्लिट्झ | ८७,१८६ |
| मलायल मनोरमा | ७८,३४७ |
| सिनेचित्र | ७७,५०० |
| स्क्रीन | ७३,०९४ |
| इलस्ट्रेटेड वीकली | ७१,१५८ |
| **( इतर )** | |
| कुमुदम् | १६७,१३६ |
| कल्याण | ११४,९४९ |


# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

स्थापना : १९११

टेलिफोन, नं. २५५४७७-७५ — पोस्ट बॉक्स नं. ७७२, तारेचा पत्ता—फार्मरबँक

मुख्य कचेरी— १, बेक हाऊस लेन. फोर्ट, मुंबई

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. १ कोटी, ४५ लक्ष |
| गंगाजळी व फंड | रु. ७२ ,, |
| ठेवी | रु. १४ कोटी, १६ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. २७ कोटी |

महाराष्ट्र राज्यांतील, शाखा व संलग्न बँका २०४

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठी चौकशी करावी.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.

# दि मिरज स्टेट बँक, लि.

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९११

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | : रुपये सहा लाख |
| खेळतें भांडवल | : रुपये एक कोट |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | : रुपये सात लाख |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर

( १ ) तीन वर्षें मुदत ठेवीकरितां व्याज दर ४ टक्के.
( २ ) पांच वर्षें मुदत ठेवीकरतां व्याज दर ४½ टक्के.

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखा: सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, ॲड्व्होकेट, चेअरमन. } के. डी. शिराळकर, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १५ फेब्रुवारी १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
—
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाबद्दल सूचना

अहमदाबाद येथील हॅरोल्ड लास्की इन्स्टिटयूटपुढें एक प्रमुख उद्योगपति श्री. एम्. ए. मास्टर ह्यांचें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमावर व्याख्यान झालें. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, हिंदुस्थानच्या अर्थव्यवस्थेचा विकास समतोलपणा राखून करण्यांत आला पाहिजे. हें साधण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत विकासाच्या कामांची जी क्रमवारी लावण्यांत आली आहे तींत बदल करणें जरूर आहे. नियोजन समितीनें तीन गोष्टींना अग्रहक्क दिला पाहिजे. (१) किंमती अधिक वाढूं न देण्यासाठी खबरदारी घेतली गेली पाहिजे, (२) सर्व उद्योगधंद्यांच्या उत्पादनशक्तीचा संपूर्णपणें उपयोग करण्यांत आला पाहिजे आणि (३) ग्राहकांना लागणाऱ्या रोजखपाच्या वस्तू तयार करणाऱ्या उद्योगधंद्यांचा पुरेसा विस्तार करण्यांत आला पाहिजे. तिसऱ्या कार्यक्रमांत अन्नधान्याच्या उत्पादनावर जोर देण्यांत आला आहे तें योग्यच आहे. तथापि सरकारच्या धोरणाच्या कांहीं अंगांवर टीका करणें अपरिहार्य आहे. विकास–कामांपैकीं जीं कामें पूर्ण झालीं आहेत त्यांचा पूर्णपणें उपयोग करून घेतला जात नाहीं. अशा परिस्थितींत नवीन कामावर कोट्यवधि रुपये खर्च करणें कितपत योग्य आहे ह्याचा विचार केला पाहिजे. किंमतीमध्यें वाढ होण्याचीं जीं अनेक कारणें आहेत त्यांत हें कारण महत्त्वाचें आहे. किंमती स्थिर राहण्याच्या दृष्टीनें विचार केला तर सरकारचीं धोरणें पुष्कळदां ह्या उद्दिष्टाला पोषक असण्याऐवजीं घातक असल्याचें आढळून येतें. कार्यक्रमांतील अग्रहक्कांचा क्रम व त्यासाठीं लागणारा पैसा उभारण्याचे मार्ग लक्षांत घेतले तर लोकांना अधिक कष्टप्रद जीवनाला तोंड द्यावें लागणार आणि उद्योगधंद्यांवर अधिक बंधनें पडणार असें स्पष्ट दिसत आहे.

———

## विद्यापीठप्रवेशावर बंदी घालणें श्रेयस्कर

कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदानप्रसंगीं भाषण करतांना दिल्ली विद्यापीठाचे उपकुलगुरु डॉ. एन्. के. सिद्धांत ह्यांनीं विद्यापीठांत शिक्षणासाठीं प्रवेश करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर निर्बंध घालण्याची सूचना केली आहे. असें केल्याशिवाय विद्यापीठांतील शिक्षणाचा दर्जा उच्च प्रतीचा राहणार नाहीं असें सांगून ते पुढें म्हणाले कीं विद्यापीठांतील शिक्षणाच्या दर्जाविषयीं सर्व शिक्षणतज्ज्ञांना चिंता वाटत आहे. शाळांत परीक्षेंत तिसऱ्या वर्गांत पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठांत प्रवेश देणें युक्त ठरणार नाहीं. तथापि, अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे दरवाजे बंद करून हा प्रश्न सुटण्यासारखा नाहीं. ह्या मुलांना कशांत तरी गुंतवून ठेवण्याचा प्रश्न सरकारला सोडवावा लागेल. विद्यापीठांनीं हें काम केलें नाहीं तर हीं मुलें रस्त्यावरून भटकूं लागतील आणि शहरांत उपद्व्याप करूं लागतील. ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठांत प्रवेश मिळत नाहीं त्यांच्यासाठीं डिप्लोमा व सर्टिफिकेटसच्या अभ्यासक्रमाची सोय करण्यांत आली पाहिजे. अलीकडे कॉलेजमध्यें शिक्षण घेण्याची जबर लालसा विद्यार्थ्यांत उत्पन्न झालेली आहे. ब्रिटिश राजवटींत सरकारला लागणारे दुय्यम दर्जाचे नौकर तयार करण्यासाठीं विद्यापीठें स्थापन करण्यांत आलीं आणि अजूनहि सरकार आपल्या निरनिराळ्या खात्यांतील जागा भरण्यासाठीं शिक्षणविषयक दाखल्यांची मागणी करते. सरकारप्रमाणेंच नौकऱ्या देणारा मालकवर्गहि सर्टिफिकेटांची मागणी करतो. अशा परिस्थितींत पदवी मिळविण्यासाठीं शिक्षण घेण्याची वृत्ति वाढीस लागल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं.

———

## रशियाच्या नव्या रुबलची किंमत

रशिअन सरकारनें आर्थिक व्यवहारांत असलेला आपला पहिला रुबल काढून घेऊन त्याऐवजीं नव्या रुबलचें चलन चालू केलें आहे जुने १० रुबल देऊन त्याऐवजीं १ रुबल नागरिकांनीं बदलून घ्यावयाचा होता. आतां जुन्या रुबलपैकीं जवळजवळ ९० टक्के रुबल व्यवहारांतून बाहेर पडलेले आहेत. नव्या रुबलची किंमतहि वस्तूंच्या विनिमयांत अधिक असल्याचा दावा रशिअन सरकारनें केला होता. रुबलची वस्तूंमधील किंमत खरोखरी वाढली आहे कीं नाहीं हें कळण्यास फारसा मार्ग नाहीं. सरकारी माहिती खात्याच्या बाहेरील माहितीवरून ह्या दाव्याला पुष्टी मिळत नाहीं. खुद्द मॉस्को शहरांतील कांहीं समाजगटांनीं मिळतील त्या वस्तु घेण्याचा सपाटा चालविला आहे अशा वार्ता आहेत. त्याचप्रमाणें विशेष मौल्यवान् वस्तू घेऊन त्यांत पैसा गुंतविण्याचीहि त्यांची प्रवृत्ति दिसत आहे. जुन्या रुबलच्या ऐवजीं नवा रुबल बदलून घेण्याच्या बाबतींत कोणतीहि मर्यादा नाहीं असें रशिअन सरकारचें म्हणणें आहे. पण, ज्या लोकांच्या जवळ जुन्या रुबलचा साठा आहे ते लोक बदला करून घेण्यास फारसे उत्सुक दिसत नाहींत; कारण हा पैशाचा साठा कोठून आला असा प्रश्न विचारला जाण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारांत आतां रुबल हें चलन डॉलर पेक्षांहि अधिक दुर्मिळ व मौल्यवान् झालें आहे, असें रशियन सरकारतर्फे सांगण्यांत येत आहे. रुबल हें चलन फक्त रशिआंतील व्यवहारांतच चालू आहे. रुबलचें रूपांतर सोन्यांत अगर इतर देशांच्या चलनांत जोंपर्यंत मोकळेपणानें करतां येत नाहीं तोंपर्यंत रशिअन सरकारच्या ह्याहि दाव्याला आधार आहे असें म्हणतां येणार नाहीं.

———

## मोटारसायकलींचा कारखाना

'जावा' मोटारसायकलींच्या उत्पादनास म्हैसूरमध्यें २५ जानेवारीस प्रारंभ झाला. फेब्रुवारीच्या मध्याचे सुमारास २·५ अश्वशक्तीची 'जावा' रस्त्यावर दिसूं लागेल. हा कारखाना दरसाल तीन प्रकारच्या (२·५, १·७५ व ·५ अश्वशक्तीच्या) १५,००० मोटार सायकली तयार करील.

**हौशीच्या प्रवासाला उत्तेजन**— काश्मीरला येणाऱ्या हौशी प्रवाशांच्या संख्येंत वाढ करण्याच्या दृष्टीनें काश्मीरचें सरकार प्रयत्न करणार आहे. प्रवाशांच्या सुखसोयींत वाढ करण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सरकारनें एक कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. गुलमर्ग व इतर कांहीं रम्य ठिकाणीं प्रवाशांसाठी दोरावरील पाळण्यांची सोय करण्यांत येईल. ह्या कामासाठी आणखी ४५ लाख रुपये खर्च करण्यांत येतील.

**चीनला धान्याची विक्री**—चीनमध्यें अवर्षणामुळें मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडल्याच्या बातम्या कांहीं दिवसांपूर्वी आल्या होत्या. चीनवर कोसळलेल्या ह्या आपत्तींत कॅनडानें मदत दिली आहे. कॅनडानें चीनला सुमारें ६० लाख बुशेल बार्ली विकत दिली आहे. कॅनडाच्या दौऱ्यावर असलेल्या चीनच्या व्यापारी मंडळानें हा व्यवहार नुकताच पुरा केला आहे. ह्या धान्याची किंमत ५३ लाख डॉलर्स आहे.

**चित्रपटांवर नियंत्रण** – फ्रेंच सरकारनें चित्रगृहांतून दाखविल्या जाणाऱ्या चित्रपटांवर नवीन नियंत्रणें जाहीर केलीं आहेत. ज्या चित्रपटांत भयप्रद कथा असतील अगर युद्धाचे देखावे असतील असे चित्रपट पाहण्यास १३ वर्षांखालील मुलांना बंदी करण्यांत आली आहे. शिवाय आणखी कांहीं विशिष्ट प्रकारचे चित्रपट पाहण्यास १८ वर्षांखालील मुलांना बंदी करण्यांत आली आहे.

**लष्करी शिक्षणाच्या शाळा**— डेहराडून येथील लष्करी शिक्षण देणाऱ्या शाळेसारख्या आणखी चार शाळा देशांतील वेगवेगळ्या भागांत काढण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. त्यापैकी एक शाळा महाराष्ट्र राज्यांत काढण्यांत येणार आहे. त्याशिवाय महाराष्ट्र सरकारहि लष्करी शिक्षणाची एक स्वतंत्र शाळा काढण्याचा विचार करीत आहे. ह्या शाळेंतील विद्यार्थ्यांना खडकवासला येथील लष्करी संस्थेंत प्रवेश मिळवून देण्याच्या दृष्टीनें शिक्षण देण्यांत येईल.

**पश्चिम जर्मनीची पाकिस्तानला मदत**—पश्चिम जर्मनीच्या सरकारकडून पाकिस्तानला १५ कोटी मार्कसूचीं कर्जे मिळण्याची शक्यता आहे. पाकिस्तानमधील औद्योगिक कारखान्यांच्या उभारणीसाठी त्यांचा उपयोग केला जाईल. मागासलेल्या देशांना मदत करण्याच्या निधींत जर्मनीनें नुकतीच वाढ केली आहे. ह्या वाढीचा फायदा मिळणारा पाकिस्तान हा पहिलाच देश असेल.

**आयुर्विमा कॉर्पोरेशनची इमारत**—भारताच्या आयुर्विमा कॉर्पोरेशननें नैरोबी येथें आपल्या कचेरीसाठी इमारत बांधली आहे. ह्या इमारतीसाठी २ लाख, १० हजार पौंड खर्च आला आहे. इमारतीचें नांव 'जीवन भारती' असें ठेवण्यांत आलें असून तिला १० मजले आहेत. नैरोबीमधील ही सर्वांत उंच इमारत आहे. ह्याच इमारतींत नैरोबी येथील इंडिअन हायकमिशनची कचेरी होणार आहे.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून
महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी

(शिड्यूल्ड बँक) **दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें** (स्थापना १९३६)

मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. (फोन नं. ६५६३)
मुंबई शाखा :—८१ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. (फोन नं. २५३४०८)

: संचालक मंडळ :

श्री. छोटालाल धरमसी जोशी (प्रोप्रायटर-कमलाकांत छोटालाल अँड क्रो. (इम्पोर्टर्स, एक्सपोर्टर्स मुंबई) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे (सुपरिंटेंडेंट, पैसाफंड काच कारखाना) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे (डायरेक्टर, साठे बिस्किट अँड चाकोलेट कं. लि. पुणें)
श्री. चिंतामण त्रिंबक चितळे (ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव)
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य (इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर)
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई (मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई)
श्री. सदाशिव कृष्णाजी भागवत (प्रोप्रायटर, राम एजन्सी) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत (व्यापारी) पुणें.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.

—बी. वासु. पाठक, ॲ. मॅनेजर.

### अन्नधान्याचें उत्पादन वाढविलेंच पाहिजे

दिल्ली येथें आफ्रिका व आशिआंतील राष्ट्रांची एक परिषद ग्रामीण पुनर्घटना ह्या विषयाचा विचार करण्यासाठी भरली होती. परिषदेला संयुक्त–राष्ट्र-संघटनेच्या शेती व अन्न उपसंघटनेचे एक प्रतिनिधि डॉ. अबदुल रझाक सिद्दिकी हे आले होते. ह्या परिषदेंत मनुष्यजातीपुढें असलेल्या भुकेच्या प्रश्नाचा विचार प्रामुख्यानें करण्यांत आला. परिषदेंत भाषण करतांना डॉ. सिद्दीकी म्हणाले, कीं जगांतील लोकांना भुकेच्या शापापासून वाचवावयाचें असेल तर अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. अन्नधान्याचें उत्पादन वाढलें तरच वाढत्या लोकसंख्येच्या पोटाला मिळण्याची शक्यता आहे. सध्यांच्या अन्नधान्याच्या तुटीच्या परिस्थितींत लवकरांत लवकर सुधारणा घडवून आणावयाची असेल तर शेतीच्या व्यवसायांत क्रांतीच झाली पाहिजे. ती घडवून आणण्यासाठी सर्व देशांनीं व त्यामधील लोकांनीं हातभार लावला पाहिजे. सध्यां जगाची लोकसंख्या ३०० कोटींच्या जवळपास आहे. ह्यापैकी निदान निम्मी तरी लोकसंख्या अर्धपोटी राहात आहे अगर तिला निकृष्ट दर्जाचें अन्न मिळत आहे. चालू शतकाच्या अखेरीला जगाची लोकसंख्या ६०० ते ७०० कोटींच्या घरांत जाईल असा अंदाज आहे. त्यावरून अन्नधान्याच्या उत्पादनांत वाढ करण्याची किती गरज आहे तें लक्षांत येण्यासारखें आहे. भुकेनें माणसें मृत्युमुखीं तर पडतातच; पण तिचे दुसरे परिणामहि घातुक होतात. भुकेनें माणसें दुःखीकष्टी होतात व त्यामुळें त्यांचा अधःपात होण्यास मदत होते. त्यांचा स्वाभिमानच नष्ट होतो. राजकीय स्वातंत्र्याला भुकेमुळें मर्यादा पडत जातात. जगांत आज लाखों लोकांना राजकीय स्वातंत्र्य मिळालें आहे. पण तें टिकविण्यासारखी परिस्थिति मात्र नाहींशी होत आहे.

### कंपन्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभांना मुदतवाढ

कंपन्यांना आपल्या वार्षिक सर्वसाधारण सभा भरविण्यासाठी आणि २८ डिसेंबर, १९६० म्हणजे कंपनीज् ( अमेंडमेंट ) ॲक्ट अंमलांत आला त्या दिनांकाच्या पूर्वी संपणाऱ्या आर्थिक वर्षाची हिशेबपत्रकें सादर करण्यासाठी तीन महिनेपर्यंत मुदतवाढ मिळूं शकेल असें डिपार्टमेंट ऑफ कंपनी लॉ ॲड्मिनिस्ट्रेशननें स्पष्टीकरण केलें आहे. तसेंच २८ डिसेंबर, १९६० पूर्वी संपणाऱ्या आर्थिक वर्षाचीं ताळेबंदपत्रकें आणि नफातोटापत्रकें जुन्या तक्त्यांप्रमाणें सादर केलीं तरी चालतील. मात्र २८ डिसेंबर १९६० रोजीं वा त्यानंतर संपणाऱ्या आर्थिक वर्षाचीं अशीं पत्रकें दुरुस्त शेड्यूलप्रमाणें सादर करावींत असेंहि या खात्यानें जाहीर केलें आहे. कंपन्यांना निष्कारण कांहीं त्रास पडूं नये, या हेतूनें ही उपाययोजना केली आहे.

### पंजाब नॅशनल बँक

पंजाब नॅशनल बँकेला १९६० सालीं १२१·१८ लक्ष रु. नफा झाला; १९५९ चा नफा ८८·६९ लक्ष रु. होता. डिव्हिडंडचा दर ( २०% ) कायम आहे.


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९१८ ] गिरगांव, मुंबई ४. [ टेलि. : ७०१४

**महाराष्ट्राची अग्रेसर सहकारी बँक**

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ... | ... | रु. ८,५९,००० |
| रिझर्व्ह फंडस् : | ... | ... | रु. ९,७३,००० |
| ठेवी : | ... | ... | रु. १,३२,००,००० |
| खेळतें भांडवल : | ... | ... | रु. २,६७,००,००० |

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहीम, पुणें, बेळगांव.

*मुख्य शाखा :* सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.



## सेंद्रिय खत हा जमिनीचा प्राण होय

( श्री. वा. कृ. कोगेकर, एल्. एजी. )

**जमिनीची सुपीकता वाढविण्याकरितां 'सेंद्रिय' खताचा उपयोग जमिनीस सतत होत गेला पाहिजे. सेंद्रिय खत हें सर्वांस मिळण्यासारखें असून त्याचें उत्पादन सर्वत्र करतां येणें शक्य असतें. हें खत मोठा खर्च करून परदेशांतून आणावें लागत नाहीं. या खतामुळें जमिनीचा पोत सुधारून पाणी धारण करण्याची शक्ति तिच्यामध्यें येते. पिकाचा सकसपणा मुख्यतः सेंद्रिय खताच्या उपयोगावरच अवलंबून असतो.**

देशांतील वाढत्या लोकसंख्येस लागणारीं अन्नधान्यें व इतर गरजा म्हणजे कपडालत्ता वगैरेंकरितां लागणाऱ्या पदार्थांचा भरपूर पुरवठा होण्याकरितां पिकांच्या उत्पन्नांत वाढ होणें आवश्यक आहे. ही वाढ शेतींतून होण्याकरितां स्थूलमानानें अवश्य लागणारे महत्त्वाचे घटक म्हणजे ( १ ) जमीन, ( २ ) पाणी व ( ३ ) खत हीं होत. या सर्वांचा योग्य प्रकारें व योग्य वेळीं मिलाफ किंवा संयोग झाला म्हणजे पिकें भरपूर येऊं शकतात. ह्या तीन मुख्य घटकांपैकीं खतासंबंधीं कांहीं विचार येथें प्रदर्शित करण्यांत येत आहेत.

### खत देण्याची आवश्यकता कां ?

राना-वनामध्यें ज्या ठिकाणीं वनस्पतींची साहजिक आपोआप उत्पत्ति होते व लयहि होत असतो अशा ठिकाणीं वनस्पती किंवा त्यांचे भाग म्हणजे पानें, फुलें, फळें, वगैरे खालीं पडून, कुजून खालील मातींत मिसळून जातात. त्याचप्रमाणें ह्या वनस्पती किंवा झाडें यांपासून मिळणाऱ्या पदार्थांवर उपजीविका करणारीं माणसें, जनावरें व इतर प्राणीहि तेथेंच वास्तव्य करीत असल्यामुळें त्यांचे अवशेष व इतर टाकाऊ पदार्थहि तेथेंच पडून कुजून मातीमय होत असतात. वरील कारणांमुळें वनस्पतीच्या पोषणास लागणारीं सर्व द्रव्यें या कुजणाऱ्या पदार्थांपासून सारखी मिळत असतात. अशा परिस्थितींत वेगळें 'खत' देण्याची गरज नसते.

### सध्यांची परिस्थिति

सध्यां शेतांत उत्पन्न होणारें धान्य, कडबा, फळें व इतर सर्व पदार्थ उत्पादनाच्या ठिकाणापासून लांब, बाहेर ठिकाणीं दूरवर शहरांकडे पाठविले जातात. त्यामुळें जमिनींतून उत्पन्न होणाऱ्या पदार्थांपासून कोणत्याहि रूपानें जमिनीस परत फारसें मिळतच नाहीं. या कारणामुळें पिकांच्या उपयोगास लागणारीं पोषक द्रव्यें जमिनींतून सारखी कमी होत जाऊन जमीन नापीक होऊं लागून पिकाचें उत्पन्न येण्याकरितां व त्यांच्या पोषणास लागणाऱ्या द्रव्यांचा पुरवठा बाहेरून करणें आवश्यक असतें. अशा रीतीनें पोषक द्रव्यांचा पुरवठा होण्याकरितां जमिनींत घालण्यांत येणाऱ्या पदार्थांस "खत" असें म्हणतात. यावरून खत घालण्याच्या आवश्यकतेची कल्पना येईल.

### खताचे प्रकार

खतें दोन प्रकारचीं आहेत. ( १ ) सेंद्रिय ( २ ) निरिंद्रीय किंवा रासायनिक किंवा कृत्रिम. यापैकी सेंद्रिय खत हें सर्वत्र मिळण्यासारखें असून हें सर्व प्रकारच्या पिकांस म्हणजे कोरडवाहू ( पावसावर होणारीं पिकें ) व बागाईत किंवा पाणी देऊन केलेलीं पिकें या दोन्ही प्रकारच्या पिकांस अत्यंत आवश्यक, उपयुक्त व हितावह असतें. थोडक्यांत म्हणजे, "सेंद्रिय" खत हा जमिनीचा "प्राण" होय. या खताशिवाय कोणत्याहि वनस्पतीची योग्य प्रकारची वाढ होऊं शकत नाहीं.

### सेंद्रिय खत कसें तयार होतें ?

सर्व प्रकारचे प्राणी व वनस्पती यांच्यापासून मिळणारे टाकाऊ पदार्थ व त्यांचे अवशेष हे सर्व कुजून त्यापासून सेंद्रिय खत तयार होतें. या खतामध्यें जनावरांचें शेण, मूत्र, त्याचप्रमाणें इतर प्राण्यांकडून बाहेर टाकले गेलेले पदार्थ यांचाहि समावेश होतो. विशेषतः जनावरांचें शेण व मूत्र, काडीकचरा, या सर्वांचा कुजलेला भाग या खतामध्यें महत्त्वाचा असतो. म्हणून यास शेणखत असें सर्वसाधारणपणें संबोधण्यांत येतें. अलीकडे या खतास 'कंपोस्ट खत' असेंहि म्हणतात.

### सेंद्रिय खताचे गुणधर्म

सेंद्रिय खतामुळें जमिनींतील अतिसूक्ष्म जंतू ( बॅक्टिरिया ) यांचें काम चालू होऊन त्यांच्याकडून पिकास लागणारीं पोषक द्रव्यें त्यास घेण्यासारख्या स्थितींत तयार होतात. ( २ ) सेंद्रिय खतामुळें जमिनीस भुसभुशीतपणा येऊन हवा खेळूं लागते व जमिनींत योग्य ती उष्णता उत्पन्न होते. ( ३ ) जमिनींतील मातीच्या कणांतील रचनेमध्यें अनुकूल असा परिणाम होतो. ( ४ ) जमिनीमध्यें ओलावा धारण करण्याची शक्ति येते. ( ५ ) जमिनीची धूप होत नाहीं. ( ६ ) जमिनींतील नायट्रोजन व इतर पोषक द्रव्यांचा पिकास पुरवठा होऊं शकतो. ( ७ ) ह्या सर्व कारणांमुळें जमीन सुपीक बनते.

### सेंद्रिय खताचें जमिनींतील कार्य

सेंद्रिय खत जमिनींत घालून मिसळू दिल्यानंतर तें कुजूं लागतें. या खतामुळें जमिनींतील सूक्ष्म जंतूंस खाद्य मिळून त्यांची वाढ होऊं लागते व त्यांजकडून खतांतील व जमिनींतील मातीच्या कणांमधील पोषक द्रव्यें पिकास घेण्यासारख्या योग्य स्थितींत आणण्याचें कार्य सुरू होतें. यावरून सेंद्रिय खत व बॅक्टिरिया ( सूक्ष्म जंतू ) यांचा किती घनिष्ट संबंध आहे, याची कल्पना येऊन सेंद्रिय खताचा जमिनींत भरपूर पुरवठा करण्याची आवश्यकताहि प्रतीत होते.

### जमिनीचा जिवंतपणा

वर दिग्दर्शित केल्याप्रमाणें जमिनींतील पोषक द्रव्यें पिकास घेण्यासारख्या स्थितींत आणण्याचें कार्य जमिनींतील सूक्ष्म जंतू यांजकडून चालूं असतें. हें सतत चालू राहाण्याकरितां व त्यामुळें जमिनीमध्यें योग्य ती परिस्थिति निर्माण होण्याकरितां सेंद्रिय खताचा भरपूर पुरवठा होणें अवश्य असतें. म्हणजे सेंद्रिय खताच्या उपयोगामुळें जमिनीस "जिवंतपणा" येतो.

ह्या उलट, कृत्रिम किंवा रासायनिक खताच्या उपयोगामुळें पिकास थोडा तात्पुरता जोर आलेला दिसून येतो. परंतु या खतांच्या सदोदित व मोठ्या प्रमाणावरील उपयोगानें जमिनीमधील सूक्ष्म जंतूंचा नाश होऊं लागून जमिनीची सुपीकता कमी होऊं लागते; म्हणजेच जमिनीतील जिवंतपणा कमी कमी होत जातो.

### सेंद्रिय खतें व त्यावर तयार झालेल्या पिकांतील पोषकपणा यांचा परस्पर संबंध

डॉ. मॅक कॅरिसन या मोठ्या शास्त्रज्ञ डॉक्टरांची हिंदुस्थान सरकारनें "मनुष्यांच्या आहारामधील कमतरतेमुळें त्यांच्यामध्यें निरनिराळ्या रोगांचा फैलाव होतो किंवा कसें" या संबंधानें चौकशी करण्याचें काम सोंपविलें होतें. या डॉक्टरांनीं आपल्या रिपोर्टांत असा उल्लेख केला आहे कीं, शेतांत सेंद्रिय खत देऊन त्यावर केलेल्या गव्हामध्यें कृत्रिम किंवा रासायनिक खत देऊन केलेल्या गव्हापेक्षा पोषकपणा १७ टक्के अधिक दिसून आला.

त्याचप्रमाणें रासायनिक खतावर केलेल्या गव्हामध्यें "ए" या जीवनसत्त्वाचें प्रमाण फारच कमी दिसून आलें. "ए" जीवनसत्त्व असलेला पदार्थ खाण्यांत आल्यास मनुष्य किंवा जनावरें यांच्यामध्यें सांथीच्या रोगास प्रतिकार करण्याची शक्ति येते. वरील प्रमाणें "बी" जीवनसत्त्वाचें प्रमाणहि सेंद्रिय खत देऊन केलेल्या गव्हामध्यें जास्त दिसून आलें. [ही माहिती पूज्य महात्माजींच्या "हरिजन" (इंग्लिश आवृत्ति अंक) तारीख १४ एप्रिल १९४६ यांत आलेली आहे. त्यावरून येथें उद्धृत केलेली आहे. ]

वरील हकीकतीवरून जमिनीस सेंद्रिय खत देऊन त्यावर केलेल्या पिकांमध्यें कस व पोषकपणा जास्त येऊन त्यांच्या सेवनामुळें रोगांस प्रतिकार करण्याची शक्ति येते, असें दिसून येईल.

## सेंद्रिय खताच्या उपयोगासंबंधीं पाश्चात्य देशांतील कांहीं माहिती

वरील बाबतींत परदेशांतील शेतकऱ्यांचेहि कांहीं अनुभव बोधप्रद होतील. पाश्चात्य देशांत जनावरांस चरण्याकरितां गवती रानें, ज्यास "पाश्चर्स" असें म्हणतात, तीं मुद्दाम वेगळीं राखून ठेवतात. या गवती रानांत जनावरें चरत असतांना त्यांचें शेण व मूत्र त्या रानांत पडल्यानें तेथें गवत चांगलें भरदार येऊन जनावरास भरपूर चारा मिळतो. या गवती रानाच्या मालकानें शेजारच्या रानांतील एका तुकड्यास (शेणखत वगैरे नसलेल्या) फक्त कृत्रिम खत दिलें व त्यांत चारणीकरितां गवत वाढूं दिलें. या मालकास असें आढळून आलें कीं, शेणखत, मूत्र, वगैरे पडून खताळलेल्या चराऊ रानामध्यें गाई चरत होत्या तोंपर्यंत प्रत्येक गाईचें दररोजचें दूध देण्याचें प्रमाण सरासरीनें २२ पौंड होतें. परंतु या गाई जेव्हां शेजारच्या कृत्रिम किंवा रासायनिक खत दिलेल्या रानांत चरूं लागल्या, तेव्हां प्रत्येक गाईचें दररोजचें दूध देण्याचें सरासरी प्रमाण १४ पौंडांवर आलें. याचें कारण असें समजून आलें कीं, कृत्रिम खत दिलेल्या भागांत आलेलें गवत जनावरांस पोषक नसून जनावरें तें आवडीनें खात नसत. त्यामुळें त्यांस पोटभर खाद्य मिळत नसे. परदेशांत झालेल्या ह्या प्रयोगावरूनहि सेंद्रिय खताचा उपयोग जमिनीस करून त्यावर तयार झालेलीं पिकें, धान्य व इतर खाद्य पदार्थ जास्त सकस खाद्य पुरवून आरोग्यरक्षणासहि मदत करतात हें स्पष्ट होतें.

पिकास शेणखताचा लागलीच उपयोग होऊं शकत नाहीं. परंतु शिलकी खताचा उपयोग, पुढें कांहीं वर्षें होत जाऊन नत्राचा सांठा होतो. उलट, रासायनिक क्षारयुक्त खतामुळें जमिनीमधील नत्रांच्या सांठ्यांत वाढ झालेली आढळून येत नाहीं.

पाश्चात्य देशांत कृत्रिम किंवा रासायनिक खतांचा उपयोग पिकांकरितां बऱ्याच मोठ्या प्रमाणावर केला जातो. याचें कारण तिकडील जमिनींमध्यें सेंद्रिय खत व ओलीचा पुरवठा असल्यामुळें कृत्रिम खताच्या उपयोगापासून फारसा अपाय होत नाहीं. परंतु आपल्याकडे वरील दोहोंचीहि कमतरता असल्यामुळें कृत्रिम खतापासून अपाय होण्याचा संभव जास्त असतो. आपल्या देशांमध्यें शेणाचा व झाडपाल्यांचा फार मोठ्या प्रमाणावर सरपणाकरितां उपयोग करण्यांत येतो. ही स्थिति पाश्चात्य देशांत नसल्यामुळें तेथील परिस्थिति फारच वेगळी आहे. तथापि आपला मुख्य भर सेंद्रिय खतावरच असणें अवश्य आहे. याकरितां आपण पिकाचे अवशेष, गोठ्यांतील शेण, मूत्र व सर्व प्रकारचा पालापाचोळा, शहरांतील केरकचरा, मैला, वगैरेंचा खताकरितां उपयोग करण्याची कोशीस केली पाहिजे.

## भारतानें काय करावें

जमिनीची योग्य सुपीकता राखणें या प्रश्नाची भारतांत पाहणी करून डॉ. स्टुअर्ट यांनीं सरकारला सूचना सादर केल्या आहेत. त्यांतील मुख्य सूचना म्हणजे 'अन्नधान्याबरोबर वैरणीचीं पिकें लावून तीं जनावरांस द्यावींत व जनावरांचें मलमूत्र सांठवून तें शेतांत टाकावें.'

गेल्या महिन्यांत (जानेवारी, १९६१) उत्तर प्रदेशांतील रुरकी येथें झालेल्या शास्त्रीय परिषदेंत जमीन शास्त्राच्या शाखेचे अध्यक्ष डॉ. एन्. आर. धार आपल्या अध्यक्षीय भाषणांत जमिनीच्या सुपीकतेसंबंधानें बोलतांना म्हणाले, "जमिनीची सुपीकता वाढविण्याकरितां ऑरगॅनिक म्हणजे 'सेंद्रिय' खताचा जमिनीस भरपूर पुरवठा करण्याची जरूरी आहे." यावरूनहि सेंद्रिय खत हा जमिनीचा 'प्राणच' होय, हें स्पष्ट होतें.

## औद्योगिक नफ्याचा इंडेक्स नंबर
(१९५० = १००)

| उद्योग | १९५१ | १९५४ | १९५५ | १९५६ | १९५७ | १९५८ |
|---|---|---|---|---|---|---|
| चहा ... | ६४·१ | २५१·० | ८२·५ | १२६·३ | ७१·६ | ८९·४ |
| कॉफी ... | १३२·९ | १३७·८ | १७१·८ | २४४·३ | १७१·५ | १६७·३ |
| कोळसा ... | १०८·२ | १०१·९ | १३२·४ | १०४·५ | १४१·१ | १५१·४ |
| वनस्पति ... | ७१·६ | ८·९ | १८९·३ | १३६·२ | ९२·९ | २२०·२ |
| साखर ... | १५१·५ | १३९·८ | १७३·३ | २०९·७ | २२८·६ | २१८·२ |
| कपास—कापड ... | १४५·४ | ९३·१ | २४५·२ | १४३·२ | ७१·७ | ८१·५ |
| ताग—कापड ... | १४५·५ | ७१·९ | ६२·७ | २२·२ | ८४·४ | १३१·९ |
| लोखंड—पोलाद ... | १३२·५ | १८१·६ | २३४·३ | २२६·१ | २१४·८ | २४२·७ |
| इंजिनिअरिंग ... | ११७·३ | १५७·४ | २५१·२ | ३०५·२ | ३३५·७ | ३५३·९ |
| रसायनें ... | ११३·४ | १०६·३ | १५१·९ | १७६·४ | २१२·७ | २३५·५ |
| सिमेंट .. | १२८·० | १५०·१ | १६८·९ | १५४·९ | १६०·५ | १७७·० |
| शिपिंग ... | २१५·४ | १०९·० | २१७·५ | ३५७·८ | ४४४·७ | ३२१·० |

स्थापना १९१६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

**हेड ऑफिस :**

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा–१. मुंबई, कोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण, १२. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९५९ |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,८८,५१.०३० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,१७,२५,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | २·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी. बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर ( जि. नाशिक ) (६) खोपोली ( जि. कुलाबा ).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★ रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★ शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★ मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर



नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

## बेळगांव

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्ये, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंगजचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

**दि बेळगांव बँक लिमिटेड.**

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर



# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१–६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

— बोर्ड ऑफ डायरेक्टर्स —

| | |
|---|---|
| श्री. म. त्र्यं. शिंगरे अध्यक्ष | न. मू. ना. पां. थोपटे उपाध्यक्ष |
| श्री. गो. बा. देवी | श्री. बा. ग. धंदुके |

## बँकेकडून कर्ज सत्वर कुणाला मिळतें ?

[ दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे जनरल मॅनेजर. श्री. चिं. वि. जोग ह्यांचें अर्जदारांना मार्गदर्शन ]

बँकेकडून आर्थिक साहाय्य हवें असणारांपैकीं थोड्यांनाच हें साहाय्य मिळण्यासाठी आपली स्वतःची काय पूर्वतयारी असावयाला पाहिजे हें माहीत झालेलें असतें. त्यामुळें पुष्कळ वेळां लायक लोकांनाहि कर्ज मिळण्याला साहजिकच विलंब लागतो. कर्ज मिळण्याला कोणकोणत्या गोष्टी आवश्यक असतात आणि आपली गरज नेमकी कोणती आहे हें बँकेला समजावून सांगण्याइतपत कित्येकांना स्वतःलाच त्याची कल्पना नसते. पत्रव्यवहार आणि हेलपाटे निष्कारण न वाढवतां कर्जमागणीचा विचार होऊं शकला तर तें उभयपक्षीं हितवाह ठरतें. बँकेची कर्जदाराकडून काय अपेक्षा असते हें त्याला जितकें सत्वर समजेल व पटेल तेवढें उत्तम.

### योग्य असामींची निवड

बँकांच्या जवळील पैसा जनतेच्या बचतीमधून आणि ठेवींतून निर्माण झालेला असतो आणि तो ठरल्याप्रमाणें परत करावा लागतो. ह्या कारणानें आपण कर्जरूपानें गुंतविलेला पैसा जरूर पडली तर तातडीनें परत मिळण्याजोगा असावा ही बँकेची मूलभूत गरज असते. पण ती कर्जदाराच्या लक्षांत येत नाहीं. बँकेचें अस्तित्वच तिनें दिलेलीं कर्जें सत्वर, ठरल्याप्रमाणें, वसूल होण्याजोगीं असण्यावर अवलंबून असतें. ह्या दृष्टिकोणांतून आपण प्रत्येक व्यवहाराकडे पाहिलें म्हणजे कितीतरी गोष्टींचा उलगडा होईल. अर्थात् कोणतीहि बँक दिलेलीं कर्जें एकाएकीं वा एकदम परत मागणार नाहीं; आपल्या कर्जदारांचा विश्वास गमावण्यास ती तयार होणार नाहीं. परतफेडीसाठी कांहीं मुदत दिली असली, तरी त्या संबंधींच्या अटी कर्जदारानें पाळल्या नाहींत तर सर्व रक्कम एकदम वसूल करण्याचा अधिकार बँकेला स्वतःकडे ठेवावा लागतो. कर्जव्यवहाराच्या बाबतींत आपला परिस्थितीवर ताबा आहे अशी बँकेला खात्री असावी लागते. “माझ्याकडील पांच–दहा हजार रुपयांनीं बँकेवर असा काय मोठा परिणाम होणार आहे ?” असें कर्जदारांना वाटणें स्वाभाविक आहे; पण अशा शेंकडों वा हजारों कर्जदारांचा बँकेशीं संबंध येतो हें विसरून चालणार नाहीं. बँकेनें प्रत्येक बाबतींत दक्षता घ्यावी तेव्हां कोठें फक्त कांहीं कर्जेंच वसुलीला ताठाळ होण्यावर निभावतें !

### कर्ज मिळवितांना होणारी कुचंबणा

बँकेला ज्याचा परिचय नाहीं अशा असामीला कर्ज देण्यास बँक तयार नसते; मग ती असामी वस्तुतः किती का मोठी असेना बँकेला ज्याच्याबद्दल विश्वास वाटतो अशालाच बँक कर्ज देते. त्यामुळें भरपूर तारण देऊं न शकणाऱ्या पण विश्वासू गिऱ्हाइकाला बँकेंतून कर्ज मिळतें आणि भरपूर तारण असणाऱ्या पण परक्या माणसाला तें चटकन मिळूं शकत नाहीं. म्हणून कर्जदारानें बँकेला आपली ओळख पटवून दिली पाहिजे, आपली व्यावसायिक पत बँकेच्या नजरेस आणून दिली पाहिजे. बँकेच्या एखाद्या जुन्या गिऱ्हाइकामार्फत बँकेकडे जाणें त्या दृष्टीनें फायद्याचें ठरतें.

बँकेला कर्जदाराचा नीट परिचय होण्याचा एक सोईस्कर मार्ग म्हणजे त्याचें बँकेंतील खातें. त्या खात्यांतील उलाढाल, आवक–जावक, चढ–उतार, शिल्लक रकमा, वसुलीसाठी येणारीं बिलें, इत्यादींवरून बँकेला खातेदाराच्या व्यवहाराची कल्पना येऊं शकते. “आमच्याकडे तुमचें खातें पाहिजे”, असें कर्जदाराला सांगितलें तरी त्याचा अर्थ त्याच्या लक्षांत येत नाहीं. कर्जाचा अर्ज मंजूर होण्याशीं त्याचा कांहीं संबंध असूं शकतो हें नव्या कर्जदाराला समजतच नाहीं. बँकेंत केवळ खातें उघडूनच भागत नाहीं, तर अर्जदाराच्या व्यवहाराचें खरेंखुरें प्रतिबिंब त्यांत पडावें लागतें. कित्येक चांगले असामी बँकेंतील खात्याबाहेरच व्यवहार करतात; त्यामुळें त्यांची कर्ज मिळण्याच्या दृष्टीनें कुचंबणा होते हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं.

### कर्जाच्या रकमेची मर्यादा

कर्जदारानें मागितलेल्या कर्जाची रक्कम, ही फार महत्त्वाची बाब असते. कारण, अर्जदाराच्या आवाक्याबाहेर कर्ज दिलें गेलें तर तें त्याच्याच हिताचें होत नाहीं आणि बँकेलाहि तें नुकसानकारक ठरतें. कर्जाची परतफेड व्हावयाची असते हें विसरून चालणार नाहीं. तेव्हां गरज आणि परतफेडीची पात्रता ह्या दोन्ही गोष्टींचा मेळ घालावा लागतो. साहजिकच, कर्जदारानें मागितलेली सर्वच्या सर्व रक्कम बँक मंजूर करतेच असें नाहीं. पुष्कळ वेळां बँक पुरेसें तारण मिळत असतांहि, प्रसंगीं आपला नफा बुडवूनसुद्धां, आपल्या गिऱ्हाइकाला कर्ज न घेण्याचा सल्ला देते. ह्याचें रहस्य हेंच आहे. कर्जदाराचें हित पाहणें हें बँकेचें अंतिम कर्तव्य आहे.

### धोक्याचे व्यवहार

भरपूर तारण असलें तरी सुद्धां सट्टेबाजीचे व्यवहार करणाराला बँक कर्ज देण्यास तयार नसते; कारण अशा व्यवहारांत नेहमींच धोका असतो. भरमसाट नफ्याच्या आशेनें केलेल्या व्यवहारांत नफा झाला तर सट्टेबाजाचा; तोटा झाला तर बँकेचा; अशी परिस्थिति निर्माण होते. चांगल्या बँकरनें समाजहिताच्या दृष्टीनेंहि सट्टेबाजीच्या व्यवहारांना आळा घालणें श्रेयस्कर ठरतें. एकाच वेळीं अनेक ‘धंदे’ करणारीं गिऱ्हाइकें ह्यासाठींच बँकेला प्रिय नसतात.

### खुलासेवार हिशेब व ताळेबंद

कर्जाच्या मागणीच्या अर्जासोबत जी खुलासेवार माहिती अर्जदारानें देणें अगत्याचें असतें, तींत त्याच्या व्यवसायाच्या ताळेबंदाला महत्त्वाचें स्थान आहे. पण कित्येक जण सालोसाल ताळेबंद काढीतच नाहींत आणि काढलेले ताळेबंदहि पुष्कळ वेळां जुनेपुराणे असतात. म्हणजे अर्जदारांना स्वतःचीच परिस्थिति नीट माहीत नसते. मग ते बँकेला ती कशी समजावून सांगणार ? ताळेबंदाचें लायक ऑडिटराकरवीं ऑडिट झालेलें असेल तर त्या हिशेबपत्रकाला विश्वासार्हता येते. ह्या ताळेबंदामुळें अनुभवी बँकरला व्यवसायाचें वास्तव आकलन होऊं शकतें; कित्येक वर्षांचे ताळेबंद एकाच वेळीं छाननी करून पाहिले म्हणजे व्यवसायाच्या प्रवृत्तींची कल्पना येते. व्यापारी देणीं केव्हांहि, स्टॉक विशेष कमी न होतां किंवा येणीं विशेष प्रयत्नांनीं वसूल न करतां, भागवितां येतील; त्याचप्रमाणें बँकेचीं देणीं देऊन टाकायला अडचण पडणार नाहीं; अशी कर्जदाराची परिस्थिति बँक अपेक्षित असते.

### योग्य तारण

बँक जरी मुख्यतः कर्जदाराच्या सचोटीला आणि पतीला महत्त्व देत असली तरी तारण कमी महत्त्वाचें असतें असें नाहीं. अर्जदार तारण देण्याचें कबूल करतो पण पैशाची त्याला निकड असते आणि सर्व कागदपत्र पुरे होण्याची वाट पाहण्यास तो तयार नसतो; पण हे कागदपत्र पुरे होण्याच्या आधीं बँक पैसे देऊं शकत नाहीं; कारण एकदा कर्जाची रक्कम हातीं पडली म्हणजे कर्जदार कागदपत्र पूर्ण करण्याला विलंब लावतो, टाळाटाळ देखील करतो, असा बँकेला कटु अनुभव आलेला असतो. म्हणून कर्जदारानें ह्या बाबतींत तत्परता बाळगणें इष्ट ठरतें.

### कर्जमंजुरीची शिफारस

बँकेकडे अर्ज पोहोंचल्यानंतर त्याची छाननी होऊन चौकशी पुरी होण्याला आणि डायरेक्टरांपुढें तो मंजुरीसाठी ठेवला जाण्याला कांहीं अवधि लागतो. अर्जदारानेंच अपुरी माहिती दिलेली असली म्हणजे ती मागवावी लागते. बँकेचे अधिकारी डायरेक्टरांना जबाबदार असतात. तेव्हां आपली स्वतःची पूर्ण खात्री पटल्याविना ते कर्जमंजुरीची शिफारस करूं शकत नाहींत. म्हणून बँकेच्या अधिकाऱ्यांना कोणती माहिती आवश्यक आहे ह्याची नीट चौकशी करून ती तत्परतेनें पुरविणें अर्जदाराच्या बाबतींत जरूरीचें ठरतें. कायदेशीर सल्ल्यासाठी बँक आपल्या वकिलाकडे कागदपत्र पाठविते आणि एखाद्या अर्जदाराच्या दृष्टीनें कमी महत्त्वाचा कागद त्यांत नसेल तरी कर्जाचा अर्ज तहकूब राहूं शकतो. बँकेकडे दर आठवड्याला कर्जाचे शेंकडों अर्ज येत असतात; ज्या अर्जाबरोबर जरूर ती सर्व माहिती दिलेली असते ते अर्ज लवकर विचारांत घेतले जाणें स्वाभाविक आहे. बँकेलाच दिरंगाई नको असते; पण अर्जदाराकडून पुरेसें सहकार्य न मिळाल्यामुळें उशीर झाला तरी तो बँकेलाच दोष देतो, अशी परिस्थिति आहे.

### विश्वास उडाला कीं निराशा झालीच !

अर्जदारानें आपल्या परिस्थितीचें चांगलें तेवढेंच चित्र रंगवून दोषस्थळें लपवून ठेवणें त्याच्या हिताचें होत नाहीं. कारण छाननी केल्यावर बँकेला हीं दोषस्थळें आढळलीं म्हणजे अर्जदारावरचा विश्वास कमी होतो आणि त्याच्यावर निराशेची पाळी येण्याचा संभव असतो. अर्जदार बँकेला चकविण्याचा प्रयत्न करीत आहे असा बँकेचा ग्रह अर्जदारानें कधींहि होऊं देतां कामा नये. स्थावराबाबत नोंदींचे अस्सल उतारे, इन्कमटॅक्ससाठी भरलेले तक्ते व पावत्या, सेल्सटॅक्ससाठी भरलेले तक्ते व पावत्या, धारण केलेले परवाने, इत्यादि कागद बँकेला पुरविण्यांत हयगय न केलेली बरी.

### दीर्घ मुदतीचीं कर्जें टाळणें

अर्जदार शहाजोग असला आणि तो भरपूर तारण देणार असला तरी त्याच्या कर्जाचा उद्देशहि बँक लक्षांत घेते. बँकेचा उद्देश केवळ नफा मिळविणें हा नसतो. व्यापाराची व उद्योगधंद्यांची वृद्धि व्हावी, नवी संपत्ति निर्माण व्हावी, असा बँकेचा व्यापक दृष्टिकोण असतो. त्यामुळें अनुत्पादक कर्जे देण्यास बँक विशेष उत्सुक नसते.

बँक सामान्यतः दीर्घ मुदतीचीं कर्जे देत नाहीं; कारण त्यांच्याकडील ठेवी तात्काळ परत द्यावयाच्या किंवा अल्प मुदतीच्या असतात. बँकेच्या कर्जाचा उपयोग खेळतें भांडवल म्हणूनच केला गेला पाहिजे. म्हणून आपण दिलेलें कर्ज जमीन, इमारत, इत्यादींत अडकून पडूं नये अशी बँकेची अपेक्षा असते. बँकेचें कर्ज वसूल होण्यास अडचण पडणार नाहीं; अशाच स्वरूपाचें तें असावें लागतें.

वरील विवेचनावरून कर्जदार आणि त्याचा व्यवसाय ह्याबाबत बँकेचा दृष्टिकोण लक्षांत येईल. कर्जाचा अर्ज सुलभतेनें मंजूर होण्याच्या मार्गांत कोणकोणत्या अडचणी येतात हें लक्षांत आलें म्हणजे त्या टाळतां येणें शक्य होईल. तहान लागल्यावर विहीर खणणें जसें शहाणपणाचें होत नाहीं तसेंच कर्जाची गरज अगदीं तांतडीची झाली म्हणजे बँकेकडे धांव घेणें श्रेयस्कर नसतें. बँकेशीं प्रथमपासून वळण असणें उभयपक्षीं सोईचें ठरतें. कर्जाची रक्कम जेव्हां लागणार असेल, त्याच्या बरेच आधीं अर्ज केलेला बरा. हिशेब नीट ठेवलेले असले म्हणजे ते आयत्यावेळीं दाखल करतां येतात. बँकेला लागणारी सर्व माहिती अर्जदारानेंच अर्जाबरोबर पुरविली तर कितीतरी वेळ व श्रम ह्यांची बचत होते. कर्जाच्या व्यवहारांत बँक आणि कर्जदार ह्या दोघांनाहि समाधान लाभलें पाहिजे; म्हणजेच दोघांचीहि आर्थिक प्रगति होत राहते.

---

**कामगाराच्या हस्तें पायाभरणी** – पिंपरी येथील हिंदुस्थान अँटिबायॉटिक्स कारखान्याच्या कामगारांसाठी एक प्रशस्त फराळगृह बांधण्यांत येणार आहे. ह्या इमारतीसाठी २ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. इमारतीच्या पायाचा दगड कारखान्यांतील सर्वांत जुन्या नोकराच्या हस्तें बसविण्यांत आला. कारखान्याच्या उत्कर्षासाठी झटणाऱ्या नोकरांचा तो प्रतिनिधि आहे, असे उद्‌गार मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राजा ह्यांनीं ह्या प्रसंगीं काढले.

**कागदाचा कारखाना** - सालेम जिल्ह्यांतील कावेरी रेल्वे स्टेशनजवळ एक कागदाचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना खाजगी मालकीचा आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी १० कोटी रुपये भांडवल लागेल. त्यांपैकी १ कोटी रुपये मद्रास इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन देणार आहे. प्राथमिक कामाला प्रारंभ झाला असून कारखाना २ वर्षांत उत्पादन करूं लागेल.

**योगशास्त्राचा अभ्यास**—अर्जेंटायनामधील एका वैद्यकीय संस्थेनें आपला एक डॉक्टर-प्रतिनिधि योगशास्त्राचा वैद्यकीय दृष्टीनें अभ्यास करण्यासाठी भारतांत पाठविला होता. त्यानें आपला अभ्यास पुरा केला असून कोणत्याहि औषधपद्धतीला उपकारक ठरेल असें हें शास्त्र असल्याचें मत व्यक्त केलें आहे. वैद्यकीय संस्थांतून त्याचें शिक्षण द्यावें असेंहि त्यांचें मत आहे.

**दुर्गापूर कारखान्यांतील भट्टी**—दुर्गापूर येथील पोलादाच्या कारखान्यांतील दुसऱ्या भट्टीचें उद्‌घाटन नुकतेंच करण्यांत आलें. ह्या भट्टीच्या साह्यानें १,२०० टन कच्चें लोखंड तयार करतां येईल. पहिल्या भट्टीचें उद्‌घाटन १९५९ अखेर झालें होतें. ह्या भट्टींतून आतांपर्यंत ३.२ लाख टन लोखंड तयार झालें आहे. दुर्गापूरचा कारखाना पूर्ण झाल्यावर त्या एकूण ३ भट्ट्या असतील.

**ओरिसाला जोडणारे रस्ते**—ओरिसा सरकारनें ओरिसा राज्य, बंगाल, बिहार, मध्यप्रदेश व आंध्र ह्या राज्यांना जोडणारे रस्ते तयार करण्याची एक योजना आंखली आहे. ह्या योजनेसाठी १०.५ कोटी रुपये खर्च येणार असून जागतिक बँकेकडून तीसाठी आर्थिक मदत मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. ओरिसा राज्यांत रेल्वे-वहातुकीची सोय चांगली नाहीं.

**मुलांसाठी इस्पितळ**—गेल्या प्रजासत्ताक दिनापासून कटक येथें मुलांच्यासाठी एक इस्पितळ खोलण्यांत आलें आहे. ह्या इस्पितळांत १०० मुलांची सोय करण्यांत आली आहे. इस्पितळ ओरिसा स्टेट रेडक्रॉस सोसायटीतर्फे चालविण्यांत येणार आहे. कटक येथील राजभवनाची जुनी इमारत इस्पितळासाठी सोसायटीला देण्यांत आली आहे.

**वाळवंटाचा विस्तार थांबवण्याचा यत्न**— कच्छच्या पूर्व भागांत असलेल्या वाळवंटाचा प्रसार थांबविण्यासाठी ५ वर्षांपूर्वीपासून प्रयत्न करण्यांत येत आहेत. त्यांना बऱ्याच प्रमाणांत यश येत आहे. ह्या भागांतील १,१०० एकर जमिनींत बाभळीचीं झाडें लावण्यांत आलीं होतीं. त्यांपैकी एक तृतिआंशापेक्षा अधिक रोपांचीं आतां मोठीं झाडें झालीं आहेत. यामुळें जमिनीची धूप बरीच कमी झाली आहे.

### कोळशाचें उत्पादन वाढविण्यासाठी परदेशीय साह्य

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत खनिज कोळशाच्या उत्पादनाचें उद्दिष्ट ३·७ कोटी टन ठरविण्यांत आलें आहे. हें उद्दिष्ट गांठण्यासासाठी परदेशांच्या मदतीची आवश्यकता असून ती मिळविण्याचे सरकारचे प्रयत्न चालू आहेत. सार्वजनिक मालकीच्या विभागांतील कोळशाच्या खाणींचा विकास करण्यासाठी सरकार अनेक देशांशीं वाटाघाटी करीत आहे. ह्या देशांत अमेरिका, ब्रिटन, रशिआ, पोलंड, फ्रान्स, पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी हे देश आहेत. जी तांत्रिक व आर्थिक मदत वरील देशांकडून मिळूं शकेल ती घेण्याचा सरकारचा मानस आहे. सार्वजनिक मालकीच्या कोळशाच्या खाणींचा विकास करण्यासाठी सुमारें ७० कोटी रुपये भांडवल लागणार आहे. त्यांपैकीं ३५ कोटी रुपयांची मदत निरनिराळ्या देशांकडून मिळण्याचा बराच संभव आहे. खाजगी मालकीच्या कोळसाखाणमालकांनीं जागतिक बँकेकडे एक निवेदन पाठविलें असून त्यांत २८ कोटी रु. च्या कर्जाची मागणी करण्यांत आली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खासगी मालकीच्या विभागांत १·७ कोटी टन कोळसा उत्पादन करण्याचें उद्दिष्ट आहे. हें उद्दिष्ट गांठावयाचें झाल्यास ६० कोटी रुपये भांडवलाची गुंतवणूक करावी लागेल. बँकेतर्फे एक तज्ज्ञांचें मंडळ भारतांत पाठविण्यांत येणार आहे. हें मंडळ सुमारें ५० कोळशांच्या खाणींची पाहाणी करणार असून उत्पादन वाढविण्यासाठी काय तांत्रिक सुधारणा करणें आवश्यक आहे हें पाहाणार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ठरलेल्या उद्दिष्टापेक्षा सुमारें ६५ लाख टन कोळसा कमी निघण्याची शक्यता आहे.

### डॉक्टरानें पेशंटला सांगावें का ?

असाध्य कॅन्सर झालेल्या रोग्याला डॉक्टरानें रोगाचें स्वरूप स्पष्ट सांगावें, का सांगूं नये ? असा प्रश्न नेहमीं उपस्थित होतो. रोग्याला जी गोष्ट कालांतरानें कळणारच आहे, ती आपण स्वतः खात्रीपूर्वक सांगण्याची जरूरी नाहीं, असें कित्येक डॉक्टरांना वाटतें. "पेशंटला सत्यस्वरूप सांगितल्यानें त्याला मोठा धक्का बसतोच असें नाहीं; कधींकधीं असें सांगणें त्याला हितावहहि ठरतें" असा निष्कर्ष स्वीडनमधील मानसशास्त्रज्ञ, सर्जन व समाजसेवक ह्यांच्या एका गटानें तपासणीनंतर काढला आहे. ज्यांचेवर शस्त्रक्रिया करतां येणें शक्य नाहीं, अशा कॅन्सरच्या ९० पेशंटपैकी ३८ पेशंटांना रोगाचें स्वरूप समजावून सांगितलें. त्यांपैकीं बहुतेकांनीं तें शांतपणें ऐकून घेतलें. फक्त पांच जणांना तें आवडलें नाहीं. "मरणोन्मुख पेशंटला मृत्यु समीप आल्याची जाणीव सतावीत असली, तरी कांहीं व्यावहारिक बाबींहि त्याला आवरावयाच्या असतात; त्या करायला मिळाल्या नाहींत, तर ते अस्वस्थ होतात. घरगुती बाबी पुऱ्या करायला संधि मिळाली म्हणजे उर्वरित आयुष्यांत शांति लाभते" असें तपासणीच्या अहवालांत म्हटलें आहे.

### हातकताईचं सूत राणीला नजर केलें

राणी एलिझाबेथ आणि तिचे पति ड्यूक ऑफ एडिंबरा ह्यांनीं दिल्ली येथील खादी ग्रामोद्योग भवन आणि सेंट्रल कॉटेज इंडस्ट्रीज एंपोरियम ह्यांना भेट दिली. त्यावेळीं खादी कमिशनचे चेअरमन श्री. वैकुंठभाई मेहता, ह्यांनीं त्यांना ८४० वार हातकताईच्या, २०० नंबरी सुताची लड नजर केली. ह्या लडीचें वजन फक्त दोन ग्रॅम होते.

### महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येंत २२% वाढ

महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ४ कोटी झाल्याचें १९६१ मधील शिरगणतींत आढळून येईल, अशी अधिकाऱ्यांची अपेक्षा आहे. म्हणजे, दहा वर्षांत ती २२% वाढली, असा अर्थ झाला.

### इराणची माजी राणी मोटार-कारखान्याची डायरेक्टर होणार

इराणच्या शहाची माजी पत्नी प्रिन्सेस सुरय्या ही एका ब्रिटिश मोटार कंपनीची डायरेक्टर झाली आहे. व्हिएन्ना शेजारीं ही कंपनी तीन चाकी, दर ताशीं ६० मैल जाणारी, गॅलनवर ७० मैल जाणारी 'नोबल २००' नांवाची बेबी कार तयार करणार आहे. ह्या कारखान्यासाठी सुरय्या भांडवल पुरविणार आहे.

### री-इन्शुअरन्स कॉर्पोरेशन

भारत सरकार री-इन्शुअरन्स कॉर्पोरेशनची स्थापना करणार आहे. सध्यां आग, अपघात, इत्यादींच्या री-इन्शुअरन्सचें बरेंचसें काम विदेशी कंपन्यांकडे जातें, तें त्यामुळें भारतांतच राहील.

**घड्याळाच्या कारखान्याची पायाभरणी**—भारतामधील घड्याळाच्या पहिल्या कारखान्याचा पायाभरणी समारंभ मध्यवर्ती उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांच्या हस्तें झाला. ह्या कारखान्यासाठी २५० लाख रुपये खर्च येणार असून त्यांत प्रारंभीं दरसाल ३,६०,००० घड्याळें तयार करण्यांत येतील. कारखाना बंगलोर येथें ३३० एकरांच्या जागेवर उभारण्यांत येत आहे.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

—: भांडवल :—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ३४,००,०००चे वर |
| गंगाजळी | रु. १६,६०,००० |
| कार्यान्वित भांडवल | रु. सोळा कोटींचे वर |

संचालक मंडळ :

श्री. वा. पुं. बर्वे, बी. कॉम, एफ. आय. बी. (लंडन) मुंबई, अध्यक्ष
श्री. धों. कृ. साठे, बी. ए., बी. एससी., पुणें.
श्री. फ. दो. पदमजी, कारखानदार, मुंबई.
श्री. मा. वी. शहा, व्यापारी, सोलापूर.
श्री. भा. म. गुप्ते, एम. ए., एलएल. बी., पुणें.
रा. ब. म. बा. जांभेकर, इंजिनीयर, लोणावळा.
श्री. म. स. पारखे, बी. ए., पुणें.
श्री. ज. के. रेगे, कारखानदार, मुंबई.
श्री वि. सी. शिरगांवकर, कारखानदार, मुंबई.
श्री. र. भि. बांठिया, व्यापारी, पनवेल.

महाराष्ट्र, म्हैसूर व आन्ध्र राज्यांत ५२ शाखा.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरी बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग, बी. कॉम., एफ. आय. बी. (लंडन) जनरल मॅनेजर.

### प्रवरा कारखान्याच्या साखरेची परदेशांत विक्री

परकीय चलन मिळविण्याच्या दृष्टीनें प्रवरा सहकारी साखर कारखान्याकडून जवळ जवळ २५,००० पोतीं साखर परदेशीं निर्यात होणार आहे. परदेशीं साखर पाठविण्याचे कामाचा शुभारंभ दिनांक १४ जानेवारी, १९६१ मकरसंक्रमणाचे दिवशीं करण्यांत आला. प्रवरा सहकारी साखर कारखाना हा भारतांतील सहकारी तत्त्वावर चालणारा पहिला साखर कारखाना असून चालू वर्षी दोन लक्ष, पन्नास हजार पोत्यांचें उत्पादन या कारखान्यांतून होईल अशी अपेक्षा आहे.

### किर्लोस्कर ब्रदर्स लि.

३१ जुलै, १९६० अखेर संपलेल्या वर्षी किर्लोस्कर ब्रदर्स लि. ला ६·९९ लक्ष रु. नफा झाला, गेल्या वर्षी तो ६·१७ लक्ष रु. होता. २·६० लक्ष रु. मॅ. एजंटाचा मेहेनताना, ७·८२ लक्ष रु. घसारा, २·४८ लक्ष रु. डेव्हलपमेंट रिबेट रिझर्व्ह, ८२,८४८ रु. डेव्हलपमेंट रिबेट ११·०६ लक्ष रु. कर, ह्याप्रमाणें तरतुदी करून एवढा नफा उरला. १०% करपात्र डिव्हिडंड देण्यांत येणार आहे. व्हर्टिकल टरेट लेथ आणि हॉरिझाँटल बोअरिंग मशीन्स ह्यांच्या उत्पादनासाठी कंपनीनें बुलर्ड कंपनी ह्या अमेरिकन फर्मशीं लायसेन्सचा करार केला आहे. इंडस्ट्रिअल केडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. कडून कंपनीनें परदेशी हुंडणावळीचें २५ लक्ष रु. चें कर्ज मिळविलें आहे. देवास येथें कारखान्याची लहानशी शाखा काढण्यास परवाना मिळाला आहे.

### म्हैसूर किर्लोस्कर लि.

म्हैसूर किर्लोस्कर लि. ( मॅनेजिंग एजंट्स : मेसर्स किर्लोस्कर असोसिएट्स, यशवंतपूर, म्हैसूर राज्य ) नें ३० जून, १९६० अखेर संपलेल्या वर्षी उत्कृष्ट प्रगति केली आहे. कंपनीच्या मशीन-टूल्सना उत्कृष्ट मागणी आहे. अहवालाचे वर्षी मजुरीचें एकूण खर्चाशीं प्रमाण २९% वरून २४% वर उतरलें; ठोक नफा २५·०५ लक्ष रु. चा ३४·५१ लक्ष रु. झाला. निव्वळ नफा ९·१२ लक्ष रु. वरून १५·०८ लक्ष रु. वर गेला. १२% करपात्र डिव्हिडंड कायम आहे. कंपनीचें वसूल भांडवल ४० लक्ष रु. आहे, तें वाढवून ८० लक्ष रु. चालू वर्षी करण्यांत येणार आहे.

### जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लि.

वरील कंपनीला ३० जून, १९६० अखेर संपलेल्या वर्षी १,४९,५४१ रु निव्वळ नफा झाला. ऑर्डिनरी भागांवर १२½% करपात्र डिव्हिडंड देण्यांत आलें. कारखान्यांत मशीन टूल्स बनविता यावींत, ह्यासाठी सरकारी परवानगी मागण्यांत आली आहे. अहवालाचे वर्षी कंपनीनें १०,८७,९६४ रु. ची विक्री केली. कंपनीचे २,२४,१७४ रु. रोख व बँकांत आहेत. ठेवींचें देणें फक्त ९,२५० रु. आहे. आर. सी. प्रेफरन्स भागांचें १,००,००० रु. भांडवल परत करून तितक्याच रकमेचें ऑर्डिनरी भाग-भांडवल केलें जाईल. कंपनीचे जनक श्री. गो. ग. ( दादासाहेब ) दांडेकर हे वयाच्या ७६ वे वर्षी १३ ऑक्टोबर, १९६० रोजीं मृत्यु पावले. त्यांना अहवालांत आदरांजलि अर्पण करण्यांत आली आहे.


५०

वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान


★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



आज बाजारात अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूंनाच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या गाढ्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यांवरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांना ब्राम्ही वनस्पती-युक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्ही सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनीं प्रयोग सुरू केले व भारतांत प्रथमच "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.

आर्य-वैद्यकाच्या इतिहासांतील महत्त्वाचें पान



१८९९-१९६०

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि. हीरक महोत्सव

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४




बेडेकर मसाले, लोणचीं व पापड आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील वापरून पहा.

तुळशीबाग? मुगभाट, मुंबई ४.

शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व पारळ.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.